**नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका -१ अ (बेलापूर ते सागर संगम) या एकूण रु. ५५७५.०० कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पास आणि सदर प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास राज्य शासनाची मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक : २२ जून, २०२६.**

**प्रस्तावना :-**

मुंबई, नवी मुंबई, पनवेल व आसपासच्या भागांदरम्यान विविध बस वाहतूक संस्थांमार्फत (नवी मुंबई महानगर परिवहन (NMMT), बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम (BEST), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC), कल्याण-डोंबिवली महानगर परिवहन (KDMT)) सेवा पुरविण्यात येत आहेत. एकूण ७७ मार्गांवर ४७५ बस कार्यरत असून, एकूण मार्ग लांबी सुमारे १,८९५ कि.मी. आहे. मुंबई महानगर प्रदेशातील एकूण रेल्वे जाळ्यापैकी सुमारे ४२% (१४४.८ कि.मी.) रेल्वे मार्गाद्वारे या परिसरास वाहतुक सेवा पुरविण्यात येते. हार्बर रेल्वे मार्ग हा मुंबई (CSMT) ते नवी मुंबई यांना जोडतो. कुर्ला येथे हा मार्ग मध्य रेल्वे मार्गाशी जोडलेला आहे. तिथून हा मार्ग पूर्वेकडे नवी मुंबईकडे वळतो. पुढे वाशी येथे हार्बर मार्ग दोन फाट्यांमध्ये विभागला जातो, त्यापैकी एक फाटा ठाणे येथे मध्य रेल्वे मार्गाला पुन्हा जोडला जातो, तर दुसरा फाटा पनवेलपर्यंत जातो. त्यामध्ये सीबीडी बेलापूर, खारघर, मानसरोवर, खांदेश्वर आणि पनवेल या रेल्वे स्थानकांचा समावेश होतो. वसई रोड ते पनवेल जंक्शन हा मार्ग दिवा रेल्वे स्थानकाद्वारे जोडलेला आहे. त्यामध्ये तळोजा पंचानंद, नवडे रोड, कळंबोली आणि पनवेल जंक्शन ही रेल्वे स्थानके समाविष्ट आहेत.

या परिसरामधील लोकसंख्या सन २०२४ साली सुमारे १९.३० लाख असून, २०६१ पर्यंत ती सुमारे ५२.१० लाखांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. या वाढत्या लोकसंख्येमुळे भविष्यातील प्रवास मागणी लक्षात घेता सक्षम, सुरक्षित व पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची नितांत गरज निर्माण झाली आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावित सार्वजनिक जलद वाहतुक प्रणाली (MRTS) प्रकल्पाच्या व्यवहार्यता व प्रवासी मागणीचे मूल्यमापन करण्यासाठी सर्वसमावेशक वाहतूक अभ्यास (CTS) २०२१ करण्यात आला. त्या अंतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, विमानतळ प्रभाव क्षेत्र व कार्यरत नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१ यांना जोडणारी सार्वजनिक जलद वाहतुक प्रणाली (MRTS) नियोजित आहे. नियोजित मेट्रो जाळे पूर्ण करण्यासाठी तसेच नवी मुंबईतील प्रवाशांच्या वाढत्या गतिशीलता गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने, सिडकोने (CIDCO) नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ (३.०२ किमी) ( बेलापूर ते सागर संगम) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) (१४.०७ किमी) यांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला आहे. सदर मेट्रो मार्गिका-१अ व मार्गिका-२ या प्रस्तावित मेट्रो मार्गांचे कार्यरत नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१ (११ किमी) सोबत एकात्मिकीकरण करण्यात येणार आहे. प्रस्तावित मेट्रो प्रणाली नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व कार्यरत नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१ तसेच त्याच्या प्रभाव क्षेत्राला जोडणी उपलब्ध करून देण्यात महत्वपूर्ण

भूमिका बजावेल. सदर प्रकल्पाचा सीवूड्स, सीबीडी बेलापूर, खारघर, नावडे स्थानक (उपनगरीय रेल्वे), पेंढार, तळोजा, पडघा, रोडपाली, कळंबोली व कामोठे या भागांना लाभ होणार आहे. सदर प्रकल्पामुळे सुमारे १९६.७ चौ.कि.मी. क्षेत्रफळात पसरलेल्या नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, उरण नगरपरिषद व नवी मुंबई न्यू टाऊन क्षेत्राचा समावेश आहे. सदर संरेखनामध्ये पनवेल-दिवा मार्गिकेवरील नावडे स्थानक (उपनगरीय रेल्वे), सीएसएमटी-पनवेल मार्गिकेवरील खांदेश्वर स्थानक, आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट पार्क व नैना (NAINA) यांना जोडणारी प्रस्तावित मेट्रो लाईन-M२४, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (NMIA) येथील हाय स्पीड रेल्वे मार्गिकेचे स्थानक, NMIA टर्मिनल-T४ या ठिकाणी प्रवासी अदलाबदल (Interchange) सुविधा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सिडकोने सादर केलेल्या नवी मुंबई मेट्रो मार्गिका-1A (३.०२ किमी) ( बेलापूर ते सागर संगम) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) (१४.०७ किमी) या मेट्रो प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहेः-

**०२. शासन निर्णय :-**

नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ व नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ प्रकल्पाचे एकात्मिक, शाश्वत व कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने असलेले महत्त्व लक्षात घेता, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित यांनी सादर केलेल्या मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रस्तावास पुढीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१. **नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ (बेलापूर ते सागर संगम) (३.०२ किमी)** आणि **नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) (१४.०७ किमी) या एकूण लांबी १७.०९ किमी, १२ उन्नत स्थानके (नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ चे १ स्थानक + नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ ची ११ स्थानके)** असलेल्या एकूण **रु. ५,५७५.०० कोटी** प्रकल्प पूर्णत्व किंमतीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) मार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
२. नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ (बेलापूर ते सागर संगम) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) या मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी सोबतच्या **परिशिष्ट-३** मध्ये नमूद केलेल्या वित्तीय सहभागाद्वारे निधी उभारुन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
३. सिडकोद्वारे युएमटीसी या संस्थेमार्फ़त तयार केलेल्या सविस्तर प्रकल्प अहवालानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. ने प्रकल्प अंमलबजावणीची कार्यवाही करावी, यासाठी स्वतंत्र सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही आपल्या स्तरावर करु नये.
४. नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ (बेलापूर ते सागर संगम) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) प्रकल्पासाठी आवश्यक असलेली शासकीय/निमशासकीय जमीन नाममात्र दराने सिडकोमार्फ़त मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसीएल) प्रदान करावी, यासाठी संबंधित विभागांना/शासकीय संस्था/निमशासकीय संस्थांना निर्देश देण्यात येत आहेत.

५. सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारच्या समभागाची म्हणून रु. ७१३ कोटी रक्कम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसीएल) ला प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या ५०% करांकरीता राज्य शासनाकडून रू. ३१८ कोटी इतके बिनव्याजी दुय्यम कर्ज (subordinate debt) प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७. तसेच जमीन संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत आणि बहुउद्देशीय एकात्मीकरण अभ्यास व स्थानिक क्षेत्र नियोजन खर्च या संबंधित खर्चासाठी सिडकोकडून रु. ४१६ कोटी इतके सहाय्य एमएमआरसीएल ला उपलब्ध करुन देण्यास सिडकोला निर्देश देण्यात येत आहेत. या अनुषंगाने राज्य शासन, सिडको व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) यांच्यामध्ये वित्तीय करारनामा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८. सदर प्रकल्पाच्या बांधकामासाठी आवश्यक असणाऱ्या कायमस्वरुपी जमीनी (प्रकल्प किंमतीत समाविष्ट नसणाऱ्या) सिडको/प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९. सदर प्रकल्पासाठी घेण्यात आलेल्या मुख्य कर्जाची परतफेड केल्यानंतर मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) सदर दुय्यम कर्जाची परतफेड वितरीत केल्याच्या प्रमाणात एका हप्त्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने करण्याबाबत, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला निर्देश देण्यात येत आहेत.

१०. सदर प्रकल्पासाठी राज्य सरकारकडून दिल्या जाणाऱ्या बिनव्याजी दुय्यम कर्जाच्या अटी व शर्ती, मूळ रक्कमेची परतफेड आणि इतर संबंधित बाबींबाबत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव/सचिव, नगर विकास विभागाचे अपर मुख्य सचिव (नवि-१) आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक यांच्यात पूरक वित्तीय करारनामा (Subsidiary Loan Agreement - SLA) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११. सदर प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून रु. ७१३ कोटीचे समभाग (equity) आणि रु. ३१८ कोटी बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य मिळविण्याकरिता केंद्रशासनाकडे विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२. सदर प्रकल्पासाठी केंद्र शासनामार्फत निधी प्राप्त करुन घेण्यासाठी केंद्र शासनाशी पत्रव्यवहार करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१३. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला (एमएमआरसीएल) द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून रु. २७२१ कोटी रकमेच्या मर्यादेत द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज दराचे कर्ज Back to Back Basis किंवा इतर उचित मार्गाने (Pass Through Assistance-PTA) संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्थांद्वारे घेण्यास राज्य शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज घेण्याच्या अनुषंगाने वित्तीय संस्था निवडणे तसेच इतर पुढील कार्यवाही करण्यासाठी व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एमएमआरसीएल) यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

१४. सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांची राहील.

१५. सदर नमूद मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीचे दायित्व/आकस्मिक जबाबदारी राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१६. सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात **कर्ज करारनामा** करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग), सिडको आणि संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यात **प्रकल्प करारनामा** करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१७. सदर मेट्रो मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य कर्ज सहाय्याच्या अटी व शर्ती, मुद्दल, व्याजाची परतफेड इ. मुद्यांबाबत अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग; अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१), सिडको व संबंधित प्रकल्प अंमलबजावणी संस्था यांच्यामध्ये **दुय्यम कर्ज करारनामा (subsidiary Loan Agreement)** करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१८. सदर प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या बाह्य सहाय्यित कर्ज उचलण्यासाठी मुदतवाढ देण्याची आवश्यकता भासल्यास त्यास वित्त विभागाच्या स्तरावरुन मान्यता देण्यास व केंद्रशासनास तशी विनंती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१९. सदर प्रकल्पाकरीता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन मार्फ़त द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्थांद्वारे किंवा इतर वित्तीय एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांची वेळोवेळी परतफ़ेड होईल तसेच याचा भार राज्यशासनावर येणार नाही याची दक्षता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने घ्यावी.

२०. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) ला **परिशिष्ट-३** मध्ये नमूद वित्तीय आराखड्यानुसार राज्यशासनाने सोसावयाच्या निधीपेक्षा अधिकचा निधी सदर प्रकल्पास उपलब्ध करुन देण्यात येणार नाही, याची नोंद मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी घ्यावी.

२१. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या **परिशिष्ट-५** मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडेदरांस मान्यता देण्यात येत आहे. तसेच, उल्लेखीत भाडेदरांत मेट्रो रेल प्रकल्प सुरू करण्यापूर्वी प्रकल्पाची वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास, शासनाच्या पूर्व मान्यतेने, आवश्यक ते बदल करण्यास मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) ला निर्देश देण्यात येत आहेत. मेट्रो कायद्यानुसार भाडेदरात पुढील बदल करण्याचे अधिकार भाडे निर्धारण समितीला (Fare Fixation Committee) आहेत, याची नोंद घेण्यात यावी.

२२. सदर मेट्रो प्रकल्प "मेट्रो रेल्वे (कामांची बांधणी) कायदा, २००९" च्या तरतुदींच्या अनुषंगाने अंमलात आणण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३.सदर मेट्रो रेल्वे प्रकल्प वेळेवर पूर्ण करण्यासाठी मेट्रो रेल्वे स्थानक सुविधांकरीता व तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६/नविन केंद्रीय भूसंपादन व पूनर्वसन व पूनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत अथवा विकास हक्क/विकास हक्क हस्तांतरण यांचे माध्यमातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४.नवी मुंबई मेट्रो मार्गिका १ अ व २ प्रकल्पाला केंद्र शासनाच्या मान्यतेस विविध प्रयोजनार्थ (उदाहरणार्थ, महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या कलम १२४B, महाराष्ट्र नगरपालिका कायदा, १९४९ च्या कलम १४९ तसेच इतर संबंधित कायदे/नियम) “महत्त्वपूर्ण सार्वजनिक प्रकल्प” आणि “महत्त्वपूर्ण शहरी वाहतूक प्रकल्प” म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२५.सदर मेट्रो प्रकल्पाच्या मार्गिकेमध्ये तसेच मेट्रो स्थानकांमध्ये गरज वाटल्यास किरकोळ बदल करण्यास, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये अथवा प्रकल्पाच्या खर्चात वाढ होत असल्यास त्यास शासनाची पूर्व मान्यता घेण्याच्या अटीवर, व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६.सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही करण्याबाबत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) ला निर्देश देण्यात येत आहेत.

२७. नवी मुंबई मेट्रो मार्ग-१ (बेलापूर ते पेंढार), १अ (बेलापूर ते सागर संगम) व २ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ T४) च्या संरेखनासाठी/प्रकल्पासाठी सिडको महामंडळाची विशेष नियोजन प्राधिकरण (Special Planning Authority) म्हणून नियुक्ती करण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे.

२८.सदर प्रकल्पाच्या मंजूर प्रकल्प पुर्णत्व खर्चामध्ये किंमतवाढ, चलन विनिमय दरांतील बदल, प्रकल्पाच्या व्याप्तीमध्ये बदल, डीपीआरमध्ये न दर्शविलेल्या आवश्यक बाबींचा समावेश, प्रकल्प उभारणीच्या विहीत मुदतीमध्ये वा त्यापुढे टाळता येणारा विलंब, अशा कारणांमुळे वाढ झाल्यास असा वाढीव खर्च स्थानिक प्राधिकरण, शासकीय/निम शासकीय संस्था त्यांच्याकडील जमिनी (डीपीआरमध्ये दर्शविलेल्या जमिनीव्यतिरिक्त) सिडको यांनी उपलब्ध करून घेऊन अशा जमिनीचे विकसन करून टीओडी, एफएसआय व इतर अनुषंगिक माध्यमातून निर्माण होणाऱ्या आर्थिक स्त्रोतामधून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२९.सदर प्रकल्पाच्या खर्चात कोणत्याही कारणाने वाढ झाल्यास, सदर वाढीचा संपूर्ण भार/दायित्व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. (एमएमआरसीएल) ने घ्यावे.

३०.नवी मुंबई मेट्रो मार्गिका १ ए व २ प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत मेट्रो मार्गाच्या आसपासच्या मोकळया जागांचा तात्पुरता वापर करण्यासाठी परवानगी देण्याबाबत संबंधित शासकीय आणि

निमशासकीय विभागांना/कार्यालयांना निर्देश देण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच, संबंधित विभागांनी सिडको/मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.ला या मोकळया जागा रु.१/- (एक रुपया) च्या नाममात्र दराने उपलब्ध करण्याबाबत निर्देश देण्यात येत आहेत.

३१. नवी मुंबई मेट्रो मार्गिका १ ए व २ या मेट्रो मार्गाच्या बाजूला सिडकोला/मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला विकसनासाठी आवश्यक असलेल्या कायमस्वरूपी जमीनीचे प्रचलित दराने सिडकोकडे/मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कडे हस्तांतरण करण्यासाठी संबंधित शासकीय/निमशासकीय विभागांना/प्राधिकरणांना निर्देश देण्यात येत आहेत.

३२. सदर प्रकल्पाच्या खर्चात भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहतीकरण यामधील विलंबामुळे वाढ होणार नाही याची दक्षता सिडको/एमएमआरसीएलने घ्यावी.

३३. या शासन निर्णयामधील जोडलेल्या **परिशिष्ट-४** येथे नमूद केल्याप्रमाणे "समर्पित नागरी परिवहन निधी" च्या उभारणीस आणि इतर स्रोतामधून उपलब्ध झालेला निधी "समर्पित नागरी परिवहन निधी" मध्ये जमा करुन तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३४. या प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी एमयुटीपी प्रकल्पासाठी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रकल्प-१७००/सीआर-३१/स्लम-२, दिनांक १२.१२.२००० अन्वये लागू केलेले पुनर्वसन धोरण सदर प्रकल्पासही लागू करण्यात येत आहे. सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.मार्फत करण्यात यावे. या प्रकल्पांमधील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी नागरी क्षेत्रात ज्या ठिकाणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. कडे सदनिका उपलब्ध होत नसतील त्या ठिकाणी नगर विकास विभाग शा.नि. क्र चंमपा-२०१७/प्र.क्र.२३/न.वि.-२६ दिनांक १३.०६.२०१८ मधील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३५. राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पातील प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दि.१५ मार्च, २०२४ अन्वये राज्यातील सर्व मेट्रो प्रकल्पांच्या समन्वयासाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार (High Power Committee) समिती गठीत करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्प हा उच्चाधिकार (High Power Committee) समितीच्या कार्यकक्षेत आणण्यात येत आहे.

३६. महाराष्ट्र प्रदेश आणि नगर नियोजन कायदा, १९६६ च्या तरतुदींनुसार नवी मुंबई मेट्रो मार्गिका- १ अ व २ अंतर्गत प्रकल्पांसाठी ट्रांझिट-ओरियंटेड डेव्हलपमेंट (TOD) अंमलात आणण्यासाठी तत्त्वतः मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३७. सदर मेट्रो रेल प्रकल्पाच्या बांधकाम खर्चात अवाजवी वाढ होणार नाही याची दक्षता घेऊन प्रकल्पाची उभारणी विहित मुदतीत करण्यात यावी, याची दक्षता सिडको/मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि.यांनी घ्यावी.

३८. सदर प्रकल्पाचे PM Gati Shakti उपक्रमांतर्गत Network Planning Group (NPG) मार्फत परीक्षण (Scrutiny) करण्यात यावे.

३९. सदर प्रकल्प पंतप्रधान गती शक्ती पोर्टलवर अपलोड करण्याबाबत व सदर प्रकल्पास महाराष्ट्र युनिक इन्फ्रास्टक्चर आयडी (MHUID) देण्याबाबतची कार्यवाही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि./सिडकोला यांनी करावी.

४०. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. /सिडकोने सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा कालबद्ध कार्यक्रम १५ दिवसात शासनास सादर करावा.

**०३.** हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाने दिलेले अभिप्राय, दिनांक --/०६/२०२६ रोजी पार पडलेल्या मा. मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**०४.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६२२१७०७२५६२२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:08:35 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ़) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि., मुंबई.
११. व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित, नवी मुंबई.
१२. सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

१३.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका, नवी मुंबई.
१४.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल.
१६.उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१७.निवड नस्ती (नवि-७).

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७, दि. २२/०६/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

## परिशिष्ट-१

## नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका -१ अ (बेलापूर ते सागर संगम) या प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | स्टँन्डर्ड गेज | १,४३५ मी.मी |
| २ | मेट्रो मार्गाची लांबी | १७.०९ कि.मी<br>१) नवी मुंबई मेट्रो मार्गिका-1A (३.०२ किमी) ( बेलापूर ते सागर संगम)<br>२) नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (१४.०७ कि.मी.) (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) |
| ३ | एकूण स्थानके | १२ (उन्नत)<br>(नवी मुंबई मेट्रो मार्गिका-१अ चे १ स्थानक + नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ ची ११ स्थानके) |
| ४ | गाड्यांचे वेळापत्रक | ५:०० ते २३:०० |
| ५ | प्रस्तावित कार डेपो | अस्तित्वात असलेले मार्गिका-१ चे तळोजा डेपो. |
| ६ | इतर आवश्यक जमीन | २४४६००.७८ चौरस मीटर |
| ७ | तात्पुरती आवश्यक जमीन (बांधकाम कालावधी दरम्यान) | २०२३.८१ चौरस मीटर |
| ८ | प्रकल्प पूर्णत्वाचा कालावधी | ४ वर्षे (२०२७-२८ ते २०३०-३१) |
| ९ | मूळ किंमत (भूसंपादनासह, स्थापत्य काम, पुनर्वसन व पूनर्वसाहत, प्रणाली काम, सामान्य सल्लागार, आकस्मित खर्चासह) | रु. ३,८०९ कोटी |
| १० | जमिनीची किंमत (मूळ) | रु. ४०८ कोटी |
| ११ | आकस्मित खर्च (३%) | रु. ११९ कोटी |
| १२ | राज्य शासनाचा कर (मूळ) | रु. २९७.९७ कोटी |
| १३ | केंद्र शासनाचा कर (मूळ) | रु. ३३७.०७ कोटी |
| १४ | प्रकल्पाची मूळ किंमत (सर्व करांसह) व मेट्रो स्थानक मालमत्ता विकास (रु. २४ कोटी) खर्चासह. | रु. ४,४६८ कोटी |
| १५ | दरवाढ | रु. ६६९ कोटी |
| १६ | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज | रु. ४३८ कोटी |
| १७ | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत | **रु. ५,५७५ कोटी** |
| १८ | आर्थिक अंतर्गत परतावा दर (EIRR) | **१७.८२%** |
| १९ | वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (IRR with PD) | **१४.३९%** |
| २० | प्रवासी क्षमता (६ डब्यांची गाडी)<br>(३ डब्यांची गाडी) | ६ प्रवासी प्रति चौरस मिटर - १७८८<br>६ प्रवासी प्रति चौरस मिटर - ८९१ |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF874 24118BCCD6EE07340581733870, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:08:50 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७, दि. २२/०६/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-२**

**नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका -१ अ (बेलापूर ते सागर संगम) या प्रकल्पाच्या खर्चाचा तपशील**

| अ.क्र. | तपशील | एकूण खर्च (रु. कोटी मध्ये) |
|---|---|---|
| १. | भूसंपादन | ४०८.०० |
| २. | मार्गिका बांधणे | ९८८.९९ |
| ३. | स्टेशन बिल्डिंग | ५६७.१४ |
| ४. | मेट्रो डेपो | ३४.७३ |
| ५. | कायम स्वरूपी मार्ग (P-Way) | १५६.८१ |
| ६. | ट्रॅक्शन व विद्युत पुरवठा | ३२७.७६ |
| ७. | संकेत व दूरसंचारण यंत्रणा | २३८.१४ |
| ८. | इतर खर्च (सेवा वाहिन्या रस्ता बांधकाम इ.) | १४२.५६ |
| ९. | रेल्वे डब्यांचा खर्च | ३३३.६ |
| १०. | सुरक्षिततेचा खर्च | ६.१७ |
| ११. | कर्मचारी इमारत | ५७.८० |
| १२. | बहुउद्देशीय एकात्मिकीकरण | १३३.०१ |
| १३. | पुनर्वसन आणि पुनर्वसाहत | ०.०० |
| १४. | प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे | ५०.०४ |
| १५. | स्वंयचलित तिकीट भाडे वसुली प्रणाली | ५८.३९ |
| १६. | पर्यावरण व्यवस्थापन आराखडा | ८.०० |
| १७. | सायबर सुरक्षा | १५.०० |
| १८. | एकुण खर्च (जमीनीची व पुनर्वसनाची किंमत वगळून) | ३११८.१४ |
| १९. | आराखड्याच्या खर्चासह सामान्य खर्च @ ५% (जमीनीची व पुनर्वसनाची किंमत वगळून) | १५५.९१ |
| २०. | आकस्मित खर्च @ ३ % (अनु.क्र. १८,१९ व २३ च्या ३%) (एकुण खर्चाच्या ३% जमीनीची व पुनर्वसनाची किंमत वगळून) व समायोज्य आकस्मिक तरतूद २ कोटी. | ११९.०० |
| २१. | एकूण खर्च आराखड्याच्या व आकस्मित खर्चासह (जमिन खर्च वगळून ) (१८+१९+२०) | ३३९३.० |
| २२. | इतर (बहुउद्देशीय एकात्मीकरण अभ्यास व स्थानिक क्षेत्र नियोजन) खर्च | ८.०० |
| २३. | एकूण खर्च आराखड्याचा खर्च, आकस्मित खर्च व जमीन व पुनर्वसनाच्या खर्चासह इतर खर्च (२१+२२+१) | ३८०९.०० |
| २४. | केंद्र व राज्याचे कर (मार्च, २०२४ च्या किंमतीनुसार) | ६३५.०० |
| २५. | मेट्रो स्थानक मालमत्ता विकास | २४.०० |
| २६. | एकूण खर्च करांसह व जमीन आणि पुनर्वसन खर्चासह (२३+२४+२५) | ४४६८.०० |
| २७. | एकुण खर्चावर दरवाढ @ ५% प्रतिवर्ष (क्र. २६ वर) चार वर्षाकरिता | ६६९.०० |
| २८. | एकूण प्रकल्प पूर्णत्व किंमत जमीन व पुनर्वसन खर्चासह (२६+२७) | ५१३७.०० |
| २९. | बांधकाम कालावधी दरम्यानचे व्याज | ४३८.०० |
| **३०.** | **एकूण प्रकल्प पूर्णत्व किंमत (बांधकाम कालावधी दरम्यानच्या व्याजासह) (२८+२९)** | **५५७५.००** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574B86F1A1EDB58BF874241188CCD6EE073405817333B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:09:01 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७, दि. २२/०६/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-३**

**नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका -१ अ (बेलापूर ते सागर संगम) या प्रकल्पाचा वित्तीय सहभाग आराखडा**

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये (कोटी) | सहभागाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | केंद्र शासनाचा समभाग | ७१३.०० | १३.८२% |
| २ | राज्य शासनाचा समभाग | ७१३.०० | १३.८२% |
| ३ | केंद्रीय करांच्या ५०% रकमेसाठी केंद्र शासनाकडून दुय्यम कर्ज | ३१८.०० | ६.१६% |
| ४ | केंद्रीय करांच्या उर्वरित ५०% रकमेसाठी राज्य शासनाकडून दुय्यम कर्ज | ३१८.०० | ६.१६% |
| ५ | द्विपक्षीय, बहुपक्षीय संस्थांचे कर्जसहाय्य | २७२१.०० | ५२.७४% |
| ६ | NMIAL चा सहभाग (विमानतळाच्या हद्दीत १.३ किमी) | ३७६.०० | ७.२९% |
| **७** | **केंद्र शासनाच्या अनुदानाकरिता पात्र प्रकल्प किंमत (६+५+४+३+२+१)** | **५१५९.००** | **१००.००%** |
| ८ | जमीन पुनर्वसन ,व पुनर्वसाहत, बहुउद्देशीय एकात्मीकरण अभ्यास व स्थानिक क्षेत्र नियोजन खर्च इसाठी सिडको .चा आर्थिक सहभाग | ४१६.०० | - |
| **एकूण प्रकल्प किंमत (८+७)** | | **५५७५.००** | **-** |

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:09:12 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७, दि. २२/०६/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-४**

**सदर प्रकल्प राबविण्याकरीता लागणारा निधी उभारण्याचे इतर विविध स्त्रोत :-**

a. मेट्रो मार्गिकांच्या दोन्ही बाजूस ५०० मी. अंतरापर्यंत येणाऱ्या जमिनीवर, अधिमूल्य आकारुन अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (एफ.एस.आय.) देण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत करुन त्यानुसार अधिमूल्याची रक्कम संबंधित क्षेत्रातील नियोजन प्राधिकरणाने वसूल करणे व अशा वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकापोटी वसूल केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपैकी ५०% रक्कम सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेकडे/ राज्य शासनाच्या नागरी परिवहन निधिमध्ये वर्ग करणे.

b. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदींनुसार महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात विकास शुल्कात १००% पर्यंत वाढ करून आकारण्याविषयी कायद्यातील तरतूदीनुसार महानगरपालिका/नियोजन प्राधिकरण क्षेत्रात वसूल होणाऱ्या रक्कमेमधून सदर वाढीव विकास शुल्काची रक्कम राज्य स्तरावरील नागरी परिवहन निधीमध्ये वर्ग करणे.

c. महत्वाकांक्षी नागरी वाहतूक प्रकल्प राबविण्यात येणाऱ्या शहरात मालमत्तेचे मुद्रांक शुल्कासोबतच १ टक्के अधिभार लावण्याची तरतूद सन २०१५ चा अधिनिमय क्र.३५ दिनांक २१.०८.२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४९ ब मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रयोजनातून प्राप्त रक्कम विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी वापरणे.

d. मेट्रो कार डेपोच्या जागा तसेच प्रकल्प अंमलबजावणी संस्थेला हस्तांतरीत जमिनींच्या वाणिज्यिक विकसनाव्दारे प्राप्त होणारे उत्पन्न प्रस्तुत प्रकल्पासाठी वापरणे.

e. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या आगमन/निर्गमन ठिकाणी, स्थानकांच्या नावांचे ब्रँडींग, डेपो, स्थानकांवरील जाहिरात तसेच ट्रेन कोचेस रॅपिंग च्या माध्यमातून जाहिरात व पार्कींगपासून मिळणारे उत्पन्न या प्रकल्पासाठी वापरणे इ.

f. मेट्रो स्थानकांवर स्थित किऑस्क, एटीएम सेंटर्स इ. माध्यमातून मिळणारे उत्पन्न.

g. सदर विविध स्त्रोतांतून प्राप्त होणारा निधी हा एका "समर्पित नागरी परिवहन निधीमध्ये" जमा करावयाचा असून तो निधी सदर प्रकल्पासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड, कार्य व देखभाल (O&M), भविष्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्यासाठी इ. साठी प्रकल्प अंमलबजावणी संस्थेस वापरण्यास मान्यता देण्याचे प्रस्तावित आहे.

प्रचालनादरम्यान मालमत्ता व्यवसाय आणि जाहिराती यांद्वारे तिकीट भाड्यामधून प्राप्त महसुलाच्या १०% इतके उत्पन्न अंदाजित केले गेले आहे. मेट्रो स्थानकांवरील आणि कार डेपोवरील मालमत्तेचा विकास करणे, स्थानकांवरील पार्किंग हक्कांचे लीजिंग, कोचेस आणि तिकिटांवर जाहिराती, स्थानकांमध्ये आणि पार्किंग लॉट्समध्ये जाहिराती, व्हायडक्ट्स, कॉलम्स आणि इतर मेट्रो संरचनांवर जाहिराती, कॉर्पोरेट क्षेत्रासाठी को-ब्रँडिंग आणि नामकरण हक्क, मेट्रो परिसरामधील चित्रपटांचे चित्रीकरण आणि विविध विशेष कार्यक्रमांच्या (Events) आयोजनाद्वारे संसाधने उभारण्यात येतील.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT,
2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:09:25 +05'30'

**(विजय चौधरी)**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**(शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३२६/प्र.क्र.१८/नवि-७, दि. २२/०६/२०२६ च्या सोबतचे सहपत्र)**

**परिशिष्ट-५**

**नवी मुंबई मेट्रो मार्गिका-२ (पेंढार ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ टि-४) आणि नवी मुंबई मेट्रो मार्गिका -१ अ (बेलापूर ते सागर संगम) या प्रकल्पाची तिकीट भाडे संरचना**

नवी मुंबई मेट्रो मार्गिका- १ च्या विद्यमान भाडे संरचनेवर दर वर्षी ५% चा वाढीचा घटक लागू करण्यात आला आहे, जो किंमतीच्या निर्देशांकातील सरासरी कल (Trend) आणि परिचालन खर्चाच्या माहितीवर (Input) आधारित आहे. सद्यस्थितीत नवी मुंबईमध्ये सध्या पेंढार ते बेलापूरपर्यंत सुमारे ११ किलोमीटर अंतरासाठी नवी मुंबई मेट्रो मार्गिका- १ कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर मार्गिकेसाठी सन २०२३-२४ या वर्षासाठी लागू केलेली भाडे संरचना खालीलप्रमाणे आहे.

| अंतर (कि.मी.) | ०-२ | २-४ | ४-६ | ६-८ | ८-१० | >१० |
|---|---|---|---|---|---|---|
| २०२३-२४ मधील भाडे | १० | १५ | २० | २५ | ३० | ४० |

वरील भाडे दरांच्या आधारे, मेट्रो रेल प्रकल्पाच्या प्रारंभापूर्वी, प्रकल्पाच्या आर्थिक कार्यक्षमतेची तपासणी करण्यात येवून आणि आवश्यक असल्यास, शासनाची पूर्व परवानगी घेऊन आवश्यक ते बदल केले जातील. मेट्रो कायद्यानुसार, भविष्यकालीन भाडे दरात बदल करण्याचे अधिकार भाडे निश्चिती समितीकडे (Fare Fixation Committee) आहेत.

VIJAY KARBHARI CHAUDHARI

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=d242787d25852443527f4a3927a849feec29ce26368b8badbee9e69852845f0a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E1FEEA176A1E6A273C574BB6F1A1EDB58BF87424118BCCD6EE07340581733B70, cn=VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2026.06.22 17:09:36 +05'30'

**(विजय चौधरी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**